RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

संपर्क मो. 8482839451

रविवार, २७ एप्रिल २०२५ | वर्ष : ५ | अंक : १२१ | दैनिक | किंमत : ₹५/-

Sunday, 27 April 2025 | Year : 5 | Issue : 121 | Daily | Rate: Rs. 5/-

## जनतेला मूर्ख बनवले जाते, सिंधूचे पाणी अडवायला 20 वर्षे लागतील : अविमुक्तेश्वरानंद सरस्वती



**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारकडून सिंधू करारावर स्थगिती देण्यात आली. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षा समितीच्या दोन तासांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सिंधू जल कारारासंदर्भात भारताने घेतलेल्या निर्णयावरुन पाकिस्तानाने टीका केली. दुसरीकडे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी मोदी सरकारकडे सिंधू नदीचे पाणी रोखण्यासाठी कोणतीही यंत्रणा नसल्याचे म्हटले आहे. जनतेला मूर्ख बनवले जात आहे असेही स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी म्हटले. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, 23 एप्रिल रोजी केंद्र सरकारने पाकिस्तानसोबतचा सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता. पाकिस्तानसोबतचा सिंधू पाणी करार स्थगित करण्याबाबत शुक्रवारी जलशक्ती मंत्रालयाची बैठक झाली. बैठकीनंतर केंद्रीय जलशक्ती मंत्री सीआर पाटील यांनी पाकिस्तानला एक थेंबही पाणी मिळणार नाही, असे म्हटले. त्यानंतर आता शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी मोठा दावा केला आहे. सिंधू नदीचे पाणी अडवण्यासाठी भारताला 20 वर्षे लागतील असे त्यांनी म्हटले. आम्ही माहिती काढली की सिंधू नदीचे पाणी थांबवण्याची कोणती व्यवस्था भारत सरकारकडे आहे. तेव्हा माहिती मिळाली की भारताकडे सिंधू नदीचे पाणी अडवण्यासाठी कोणतीच व्यवस्था भारताकडे नाही. जर भारताला सिंधू नदीचे पाणी पाकिस्तानात जाण्यापासून थांबवण्यासाठी व्यवस्था करायला लागली तर कमीत कमी 20 वर्षे लागतील. पैसे किती लागतील याचा विचारच करु नका. कमीत कमी 20 वर्षांचा वेळ लागेत तेव्हा सिंधू नदीचे पाणी भारत आपल्याकडे अडवू शकेल. तुम्ही म्हणताय की आम्ही सिंधू नदीचे पाणी थांबवू. याचा अर्थ जनतेला मूर्ख बनवले जाते. ज्यांचे अपयश आहे त्यांना पकडले पाहिजे, असे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती म्हणाले. आता खात्री झाली आहे की कोणीतरी हिंदूंना आव्हान देत आहे. जर असे आव्हान असेल तर सरकारने आव्हान स्वीकारले पाहिजे आणि उत्तर दिले पाहिजे. ते म्हणतात की ते चौकीदार आहेत, पण तरी अतिरेक्यांना प्रतिकार करण्याचा कोणताही प्रयत्न झाला नाही. जर ते पाकिस्तानातून आले असतील तर कारवाई झाली पाहिजे. या घटनेतून आपल्याला शिकण्याची गरज आहे. सगळ्यात आली आपल्याला अशा लोकांना जबाबदार धरण्याची, शिक्षा देण्याची गरज आहे ज्यांनी आपले रक्षण करण्यात चूक केली आहे. नंतर, जर बाहेरचा कोणाचा हात असेल तर आपण त्यांच्यावरही हल्ला केला पाहिजे, असेही स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती म्हणाले. या घटनेवरून कळते की, प्रत्येक हिंदूला आता स्वतःची सुरक्षा स्वतः करावी लागेल. आवश्यकता पडली तर शस्त्र आणि शास्त्रही शिकले पाहिजे आणि शस्त्र बाळगलेही पाहिजे. आपल्या घरात आपण चौकीदार ठेवलेला आहे. जेव्हा आपण बाहेर जातो, तेव्हा घरात घडलेल्या घटनेला चौकीदार जबाबदार असतो. पण इथे असे होत नाही. काही लोक म्हणतात, मी चौकीदार आहे. चौकीदाराने त्याचे काम प्रामाणिकपणे केले असते तर असा हल्ला करण्याची कुणाचीही हिंमत झाली नसती. पण इथे तर हल्लेखोर आले आणि आरामात निघून गेले. मग चौकीदार कुठे होता? चौकीदाराची कुठेच चर्चा होत नाही. आता म्हणत आहेत, आम्ही त्यांना धडा शिकवू वैगरे, अशी टीका स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी केली. अतिरेकी पाकिस्तानातून आले, असे आता सांगितले जात आहे. तुम्हाला इतक्या लवकर हे कसे कळले, जर आता कळले असेल तर मग घटना घडण्याची आधी का नाही समजले.

## नागपुरात 2200 वर पाकिस्तानी नागरिक!




**नागपूर :** उपराजधानीत जवळपास दोन हजार दोनशेपेक्षा जास्त पाकिस्तानी नागरिक व्यवसायाच्या निमित्ताने राहतात. त्यात सर्वधर्मीयांचा समावेश आहे. भारत सरकारकडून त्यांनी रितसर 'व्हिसा' घेतलेला आहे. त्यामुळे त्यांचे वास्तव्य कायदेशीर ठरते. पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याच्या घटनेनंतर केंद्र सरकारने भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना 48 तासांत भारत सोडावा, असे निर्देश दिले आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. तसेच याबाबत गुप्तचर विभाग सतर्क झाला आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नागपुरात जवळपास 2 हजार 200 पेक्षा अधिक पाकिस्तानी नागरिक व्यवसायानिमित्त किंवा अन्य कारणास्तव नागपुरात राहतात. उत्तर नागपूर आणि जवळपासच्या परिसरात 'व्हिसा'वर आलेल्या या नागरिकांची संख्या मोठी आहे. सुरक्षाविषयक केंद्रीय समितीच्या (सीसीएस) बैठकीनंतर नागपुरात सुरक्षा दलाकडून शोध मोहीम राबवण्यात आली आहे. मात्र, यासंदर्भात पोलीस प्रशासनाला अधिकृत निर्देश अद्यापही प्राप्त झाले नाहीत. खबरदारी म्हणून पोलीस प्रशासन ही मोहीम राबवत आहे. नागपुरात वास्तव्यास असलेल्या पाकिस्तानी नागरिकांची पोलीस विभागाकडे अधिकृत माहिती असली तरी 'व्हिसा' संपल्यानंतरही ते नागपुरात वास्तव्यास आहेत काय? कोणता व्यवसाय करतात? अशी माहिती नव्याने घेतली जात आहे. पाकिस्तानी नागरिक 'व्हिसा'ची मुदत संपल्यावर त्याचे नूतनीकरण करतात. व्यवसाय करणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांत सर्वधर्मीयांचा समावेश आहे. मात्र, त्यांचा व्हिसा रद्द केला जाईल. त्यांना 48 तासांत देश सोडण्याचा निर्वाणिचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागपुरात 'व्हिसा'वर वास्तव्यास असलेल्या पाकिस्तानी नागरिकांत भीती आणि चिंता पसरली आहे.

### संभाजीनगरात बुद्ध विहाराचे तिसरे राष्ट्रीय अधिवेशन सुरू

## चांगले भिख्खू निर्माण करण्याची जबाबदारी ही समाजाची : भिख्खू विनयरक्खिता




**संभाजीनगर :** बुद्ध विहारांचे संचालन हे बौद्ध भिक्खूकडे असावे. उपासकांनी बुद्ध विहार बांधून ते भिख्खू कडे सोपवावे. प्रत्येक बुद्ध विहारांमध्ये भिख्खू असले पाहिजे. चांगले भिख्खू निर्माण करण्याची नैतिक जबाबदारी ही समाजाची आहे. असे प्रतिपादन भिख्खू विनयरक्खिता, महास्थवीर (मध्यप्रदेश) यांनी केले.

बुद्ध विहार समन्वय समिती व्दारा संभाजीनगर येथे आयोजित बुद्ध विहाराच्या तिसऱ्या दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाचे अध्यक्ष भिक्खू विनयरक्खिता उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ. प्रदीप आगलावे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी काम्रेड धनाजी गुरव, प्राचार्य डॉ. एम. ए. वाहूळ, सूर्यकांता गाडे, अधिवेशनाचे मुख्य आयोजक अशोक स्वरस्वती, सुकाणू समितीचे अध्यक्ष राजनंद सुरडकर, स्वागताध्यक्ष प्राचार्य सुनील वाकेकर, चेतन कांबळे इत्यादी उपस्थित होते. अधिवेशनाच्या उद्घाटन करतांना डॉ. प्रदीप आगलावे म्हणाले की, 'बुद्ध विहारांचा फार मोठा ऐतिहासिक वारसा आपल्याला लाभला आहे. बुद्ध विहार हे शिक्षण आणि संस्कारांची केंद्रे होती. कर्नाटक राज्यातील म्हैसूर शहरा जवळ बायकुप्पे येथील तिबेटीयन विहार आहे. या विहारात हजारो भिक्खू आणि श्रामनेर आहेत. येथे चार वयाच्या वर्षापासून श्रामनेर आहेत. त्यांच्या शिक्षणासाठी तेथे शाळा आणि कॉलेज आहे. तेथे आदर्श भिक्खू निर्माण होतात. अशा प्रकारचे विहारे आम्ही निर्माण केले पाहिजेत.' कार्यक्रमाचे संचालन प्रा. भारत शिरसाट यांनी केले तर आभार डॉ. आनंद भालेराव यांनी केले. त्यानंतर 'भारतीय बौद्ध समाजाच्या समस्या आणि उपाय' या विषयावर भिख्खू विशुद्धानंद बोधी महाथेरो यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या सत्रात जी. मोहनन (तामिळनाडू), डॉ. अरुणा लोखंडे, आणि धम्मचारी सूचिरत्न यांनी आपले विचार मांडले. दुसरे सत्र राजेंद्र भालशंकर यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे सत्र झाले. या सत्रात डॉ. प्रतिभा अहिरे, स्मिता खैरनार (कर्जत), जयाजी पाईकराव, डॉ. उल्हास आंबेडकर (गोवा), कैलासचंद खाडेलकर यांनी सहभाग घेतला. तर तिसऱ्या सत्राचे अध्यक्ष दीपक कामत होते. या सत्रात व्ही. पी. सिंग, प्रा. भारत शिरसाट, डॉ. रंजना वांडकर (गुजरात), महेंद्र बुद्धध रत्न, जे. पी. शेजवळ यांनी आपले विचार मांडले.

## ताडोबात बुद्ध पौर्णिमेला निसर्गनुभव उपक्रम




**चंद्रपूर :** वाघ, बिबट्या व इतर वन्यजींवाच्या हमखास दर्शनासाठी जग प्रसिद्ध असलेल्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामार्फत 12 मे 2025 ला बफर क्षेत्रात बुद्ध पौर्णिमेला निसर्गानुभव उपक्रम निसर्ग प्रेमीसाठी राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमासाठी बफर क्षेत्रातील चंद्रपूर, मूल, मोहर्ली, खडसंगी, पळसगाव व शिवणी या सहा वनपरिक्षेत्रातील 50 मचाणी सज्ज करण्यात आलेल्या आहेत. निसर्ग प्रेमींकरिता ताडोबातील वन्यजीवन मचाणीवर बसून अनुभवण्याची ही सुवर्ण संधी आहे. या प्राणीगणनेमध्ये सहभागी होण्यासाठी 28 एप्रिल ते 5 मे 2025 या कालावधीत http://mytadoba.mahaforest.gov.in/ या संकेत स्थळावर बुकिंग सुरु होणार असून एकूण 100 निसर्गप्रेमी यामार्फत बुकिंग करू शकतात.

सदर उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी प्रती व्यक्ती 4500 रुपये इतके शुल्क आकरण्यात येणार आहे. सहभागी होणाऱ्या पर्यटकांनी संकेतस्थळामार्फत 1500 रुपये अदा करून भरलेल्या रकमेची पावती सबंधित पर्यटन गेटला दाखवावी. उर्वरित रकमेमध्ये जिप्सी शुल्क 2000 रुपये पर्यटन गेट ते मचाण प्रवास खर्च व मार्गदर्शक शुल्क 1000 रुपये इतके सबंधित पर्यटन गेटवर रोख स्वरूपात देण्यात यावे. सहभागी होणाऱ्या निसर्गप्रेमींनी शाकाहारी जेवणाची व पाण्याची व्यवस्था स्वतः करावी तसेच कॅमेरा व सर्चलाईटला सदर उपक्रमामध्ये परवानगी नाही. इतर माहितीकरिता वरील संकेत स्थळावर भेट देण्यात यावी. सदर उपक्रमाविषयी काही अडचणी असल्यास कार्यालयीन वेळेस सुमित कोहळे, 8421461698 (सहाय्यक पर्यटक व्यवस्थापक, उपसंचालक बफर कार्यालय, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आनंद रेड्डी, वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प यांनी केले आहे.

## देवेंद्र फडणवीस शिंदेंच्या आमदारावर संतापले



**मुंबई :** राज्यात सध्या महायुतीचे सरकार आहे. या महायुतीत एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष आणि भाजपा हे तीन पक्ष एकत्र आहेत. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर यात तिन्ही पक्षांचे नेते अनेकदा एकमेकांसमोर आलेले आहेत. निधी मंजुरीच्या मुद्द्यावरून तर या तिन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये अनेकदा धुसफूस झालेली पाहायला मिळाली. दरम्यान, आता शिंदे यांच्या पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांच्या एका विधानाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संताप व्यक्त केलाय. विशेष म्हणजे त्यांनी संजय गायकवाड यांना भविष्यात अशी विधाने केली तर थेट कारवाई केली जाईल, अशी तंबीच दिली आहे. देवेंद्र फडणवीस हे माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. यावेळी बोलताना पत्रकारांनी त्यांना संजय गायकवाड यांनी केलेल्या विधानाबाबत विचारण्यात आले.

विवाह संबंधित



एक पहल (लग्न देखील आणि उद्योग देखील)

परिचय सम्मेलन
तरुण - बौद्ध उद्योजक
तरुणी - उद्योजक / कार्यरत व्यावसायिक,

दिनाक : 9 04 मे 2025,
वेळ : सकाळी 10.00 ते संध्या.6.00
दुपारचे जेवण आणि चहा समाविष्ट आहे.
नोदंनी सुरु आहे.

स्थळ : क्वीन्स कोर्ट हॉल, फॉर्च्यून रीगल बँक्वेट, सीताबर्डी, नागपूर, नोंदणी सुरू आहे. संपर्क - 9975359670, 9022766347

### केवळ हिंदू-मुस्लीमच नव्हे तर सर्व धर्माच्या ऐक्याची गरज : डॉ. श. नू. पठाण

## संविधान प्रास्ताविक वाचून 10 व्या अ. भा. मुस्लीम मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन




**नागपूर :** धार्मिक उन्मादामुळे प्रत्येक देश आतून पोखरला जातोय. त्यामुळे केवळ हिंदू-मुस्लीम एकोप्याचे कार्य करून चालणार नाही. तर जगातील सर्व धर्माच्या ऐक्याच्या कार्याची या देशाला व जगाला अत्यंत आवश्यकता आहे, असे प्रतिपादन माजी कुलगुरू, एमआयटी पुण्याचे सल्लागार आणि दहावे अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष डॉ. श. नू. पठाण यांनी येथे केले.

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेतर्फे मातोश्री विमल देशमुख सभागृह धनवटे नॅशनल कॉलेज येथे आयोजित दहाव्या अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी संमेलनाध्यक्ष म्हणून ते बोलत होते. या परिसराला मरहूम डॉ. अक्रम पठाण साहित्य नगरी तर विचारपीठाला महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. आंबेडकर विचार मंच असे नाव देण्यात आले होते. या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनुपमा उजगरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर माजी खासदार हुसेन दलवाई, प्राचार्य डॉ. प्रशांत कोठे, मुख्य आमंत्रक प्रा. जावेद पाशा कुरैशी, प्रा. कोमल ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते नितीन सरदार, अब्दुल रऊफ शेख, सरदार जगजित सिंग, ॲड. आसिफ कुरैशी, प्रा. रमेश पिसे, प्रा. फ. म. शहाजिंदे, ज्ञानेश्वर रक्षक, कुलदीप रामटेके प्रामुख्याने उपस्थित होते. संमेलनाध्यक्ष डॉ. श. नू. पठाण म्हणाले, मुस्लीम समाजाला शिक्षणाचे कार्यच विकासाकडे घेऊन जाईल. त्यामुळे शिक्षणावर अधिक भर द्या. एकमेकांवर दोषारोप करण्यापेक्षा समन्वयाचा जागर करा असे ही म्हणाले. मुख्य आमंत्रक प्रा. जावेश पाशा कुरैशी यांनी संमेलनाची भूमिका विशद केली. सरदार जगजित सिंग, नितीन सरदार, अब्दुल रउफ शेख यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. संचालन नेहा गोडघाटे यांनी केले. तर मुबारक शेख यांनी आभार मानले.



संत गाडगेबाबा बहुउद्देशीय आश्रम जरूड
बुद्ध विहार समन्वय समिती द्वारा आयोजित



बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर
राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर
रविवार २५ मई से १ जून, २०२५ आठ दिवसीय निवासी शिबीर
शांतीवन चिंचोली (फेटरी) नागपूर (महाराष्ट्र)
बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर (१०० बाल-बालिका, उम्र १३ से १६ साल)
राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर (५० भारत के नागरिक, उम्र १८ से ७० साल, अंग्रेजी, हिंदी, मराठी भाषामें
* पालि भाषा प्रशिक्षक *
आचार्य राजेंद्र भालशंकर (नाशिक)
* मुख्य संयोजक *
सतिश गायकवाड / बबिता गायकवाड
८९९९९६०७९३ / ९९७००८३४३७ / ९६६५६१४३४१
* मुख्य आयोजक *
अशोक सरस्वती बौद्ध / प्रा. डॉ. प्रमिला चिंचखेडे
मो. ८५३०९८०७४१ / ८७८८६०७३२३
आपली नाव नोंदणी करा. (निशुल्क)
अपना नाम दर्ज करने की कृपा करे (निशुल्क)

## पाकिस्तानचे प्रधानमंत्री शहबाज शरीफ यांचा भारताला थेट इशारा

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. दोन्ही देशांनी एकमेकांच्या विरोधात कारवाई केली आहे. भारताने सिंधु पाणी करार संपवला आहे. त्यामुळे पाकिस्तानची चांगलीच घाबरगुंडी उडाली आहे. पाकिस्तानच्या प्रधानमंत्रांपासून विरोधी नेत्यांपर्यंत भारताला धमकवले जात आहे. प्रधानमंत्री शहबाज शरीफ यांनी पाकिस्तानचे पाणी कमी केले किंवा थांबवले तर पूर्ण ताकदीने उत्तर दिले जाणार असल्याचे म्हटले आहे. पाकिस्तानचे प्रधानमंत्री शहबाज शरीफ यांनी म्हटले की, आम्ही कोणत्याही प्रकारच्या धाडसाला उत्तर देण्यासाठी पूर्णपणे तयार आहोत. याबद्दल कोणीही चूक करू नये. पाकिस्तान 24 कोटी लोकांचा देश आहे. आम्ही आमच्या शूर सशस्त्र दलांच्या मागे नेहमी उभे राहणार आहे. हा संदेश स्पष्ट आहे. शांतता आमची प्राथमिकता आहे. परंतु आम्ही आमच्या अखंडतेशी आणि सुरक्षिततेशी कधीही तडजोड करणार नाही.






"एक पाऊल आर्थिक सक्षमतेकडे .....!"
बानाई क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि. नागपूर
रजि. नं. : एनजीपी/आरएसआर/सीआर/1546/2024
पत्ता : प्लॉट नं. 311-A, बेझनबाग प्रगतीशिल कामगार गृहनिर्माण संस्था, जिंजर मॉल जवळ, जरीपटका बस रोड, नागपूर - 440014
कार्यालयीन फोन नं. : 0712-4079005
आपल्या स्वप्नांना आकार देणारी संस्था



१४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ते १२ मे बुद्ध जयंती पर्यंत च्या कालावधीत विशेष सवलती योजना.

सावधी जमा योजना (FD) विशेष व्याज दरामध्ये उपलब्ध

| कालावधी | सर्वसाधारण | जेष्ठ नागरिक व महिला |
|---|---|---|
| 1 वर्ष | 7.75 % | 8.25 % |
| 2 वर्ष | 8.00 % | 9.00 % |
| 3 वर्ष | 8.25 % | 9.25 % |

सुलभ कर्ज सुविधा झिरो प्रोसेसिंग फी सह उपलब्ध

पतसंस्थेत चालु असलेल्या इतर योजना
१) बचत खाता (Saving Account)
२) मासिक आवर्त ठेव योजना (RD)
३) मासिक आय योजना (MIS)
४) दैंनिक बचत योजना (SSD)
५) वैयक्तिक कर्ज योजना (Personal Loan)
६) सोने तारण योजना (Gold Loan)
७) गहाण कर्ज योजना (Mortgage Loan)
८) सावधी जमा योजना (Fixed Deposit)
या योजनेच्या सर्व नागरिकांनी अवश्य लाभ घ्यावा.

विश्वास हाच आमचा पाया... आणि तुमचा आर्थिक उत्कर्ष हेच आमचं ध्येय

संपर्क : अनुप कुमार सांगोडे (अध्यक्ष) मो. 9423686121 अनिल बहादुरे (उपाध्यक्ष) मो. 9890216150 व्यवस्थापक : मो. 9665863188

काळ बदलत असतो तसे प्रश्न देखील बदलत असतात. त्यावर उपाय देखील नवे असावे लागतात. जुने विचार, जुने उपाय, जुन्या संवयी, जुने साधने, जुन्या पद्धती कालबाह्य होतात. जुने मित्र आणि जुने शत्रू हे सर्व कालबाह्य होतात. हे चळवळी चालवत असलेल्या क्रांतिकारकांना कळले असेलच हा आशावाद बाळगायला हरकत नाही.

# आंबेडकरवादी चळवळी समोर नवे प्रश्न नवे उपाय




**समाज आणि चळवळ** :- आंबेडकरी चळवळीचा जनाधार बौद्ध समाज आणि तोही 1956 चा धर्मांतरित. आज तो पूर्णपणे विभाजित आहे. त्याला एक नेता नाही, एक संघटन नाही, एक कार्यक्रम नाही त्यामुळे प्रत्येक जण नेता झाला. कार्यकर्ता उरला नाही. नेत्यांना काडीचाही जनाधार नाही. त्याहीपेक्षा शोकांतिका धोरण नाही. बिल्डर, गुंड, सेवानिवृत्त महत्त्वाकांक्षी अतृप्त अधिकारी, शत्रूंचे हाती खेळणारे राजकीय दलाल यांचे तावडीत समाज सापडला. तो चिंताग्रस्त आहे. काय करावे हे त्याला सुचत नाही. नेत्यांचे अभिनयातील लांडगे समाजाला कुरतडत आहे.

**गरीब अडाणी समाज** :- आंबेडकरी चळवळीला आधार देणारा अडाणी आणि गरीब समाज मोठ्या संख्येने आहे. त्यांचे आर्थिक प्रश्न बिकट आहेत. शिक्षण आणि नोकऱ्या यापासून तो दूर आहे. हमाली, मजुरी, घर कामगार, शेतमजूर, बांधकाम कामगार, रिक्षा, हातगाडी, महानगर पालिका सफाई कामगार ही कामे तो करतो. नागपूर मनपा मध्ये 7000 हजार सफाई कामगार मध्ये 3000 बौद्ध आहेत. जास्तीत जास्त महिला आहेत. त्यांच्या नियुक्त्यांची दुखःद, हिडीस, इज्जत वेशीवर टांगणारी पण न सांगण्यासारखी कहाणी आहे. तो समाजभावनेने बुद्ध आंबेडकरांना मानतो. मात्र परिस्थितीमुळे लाचारी आणि अज्ञानाने पार पोखरला आहे. आपले अस्तित्व हरवून बसला आहे. स्वाभिमानशून्य झाला आहे. त्याचा गैरफायदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना ही शत्रू पक्ष घेत आहेत. महारांना पैसे द्या आणि विकत घ्या असा त्यांचा विश्वास झाला आहे. समाजातील काहींनी आम्ही विक्रीस आहोत असे धोरण यांनी ठरवले आहे. ते जय भीम म्हणतात आणि कार्य शत्रूंचे करतात.

**श्रीमंत वर्गाची मानसिकता** :- पूर्वी सारखी आज अस्पृश्यता नाही. जातीयवादाचे स्वरूप बदलले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, काँग्रेस, भाजप, सेना हे पक्ष समाजातील श्रीमंत आणि गुंड लोकांना जवळ करतात. त्यांना आर्थिक लाभ मिळून देतात. त्यांना मानसन्मान देतात. त्यांची कामे करतात. त्यांची प्रतिष्ठा जपतात. त्यामुळे ते त्यांचे सोबत सामील होतात. ते आंबेडकरी चळवळीपासून अंतर ठेऊन वागतात. सोबत असल्याचा मात्र देखावा करतात. काही अपवाद वगळता चळवळीला त्यांचा काहीही लाभ नाही.

**विचारवंत,प्रचारवंत, स्वयं घोषित प्रसिद्धी लोलूप नेते** :- विचारवंतांची अशावेळी मोठी जबाबदारी असते. ते विचार मांडतात. पण ते संघटीत विचार मांडत नाहीत. विचार मांडून मोकळे होतात. लोकांना वाटत असेल तर ते स्वीकारतील या आशेवर ते विचार मांडत असतात. त्यांनी जर संघटित आवाज काढला तर नक्कीच लाभ होईल. ती वाट बघावी लागेल. कधीतरी ते घडेल. प्रचारवंत स्वनामधन्य आहेत. माझा फोटो, माझे नाव, माझे भाषण, मी किती मोठा या नशेत तो झिंगत आहे. त्यांना परिस्थितीचे गांभीर्य नाही. सेल्फी, पोस्ट, वात्रट चर्चा याच नादात ते राहतात. स्वयं घोषित नेते फ्लेक्स लीडर आहेत. चौकात फोटो असलेला फ्लेक्स गल्लोगल्ली या प्रसिद्धी पंडितांचे पाहायला मिळतात. त्यातच त्यांना मोठा आनंद होतो. ते त्यांचे काही पिलांटू तयार करून फिरत असतात. जिथे संधी मिळाली तेथे पुढे पुढे करावे. ते मयत आणि स्मशानघाटात देखील तसेच वर्तन करतात.

लेखांक १०८



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

**प्रस्थापित नेते बेजबाबदार** :- लोकशाही संकटात आहे, शिक्षण जवळपास थांबले आहे. नोकऱ्या बंद केल्या गेल्या आहेत. देशात अघोषित आणीबाणी आहे. सर्वत्र दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. इव्हीएम मशिनमुळे मताच्या अधिकाराचे शस्त्र निष्प्रभ होत आहे. धार्मिक अल्पसंख्य लोकांचे धर्मस्थळात ब्राम्हण लोक हक्क सांगत आहेत. महिला असुरक्षित आहेत. शेतकरी बेबस आहे. बेरोजगारी आणि महागाई पेट घेत आहे. प्रस्थापित नेते अश्यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आणि भाजपचे दारात त्यांचा जयजयकार करीत आहेत. ते एक दुसऱ्याचे तोंड बघायला तयार नाही. काही समोरचे दारातून आणि काही लपून मागचे दारातून भाजपला मदत करीत आहेत. केवळ धनशक्तीचे आकर्षण हे त्याला कारण आहे.

**यातून मार्ग काढावाच लागेल** :- परिस्थिती कितीही बिकट असली तरी काही लोक त्यातून मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करीत असतात. त्यांना एक दिवस यश मिळत असते. त्यामध्ये दोन प्रवाह आहेत. एक अगदीच पारंपरिक पद्धतीने विचार करणारा आणि दुसरा नव्याने विचार करणारा. यामध्ये विचार मंथन होणे गरजेचे आहे. त्यामुळे ती टीका आहे असा गैरसमज करू नये.

**मातृ संस्था म्हणून मांडणी** :- मातृ संस्था हा शब्द राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि बामसेफ या बद्दल प्रचलित आहे. अलीकडे समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा आणि भारतीय रिपब्लिकन पार्टी याबद्दल मातृसंस्था हा शब्द वापरला जातो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या त्या संघटना आहेत. म्हणून त्यांना मातृ संघटना म्हटल्या जाते आहे. म्हणून सर्वांनी त्यांचे नेतृत्वात कार्य करावे. त्या संघटना बळकट कराव्यात. असा विचार मांडला जात आहे. या विचाराला जुने लोक स्वीकार करतात. परंतु नव्या सुशिक्षित पिढीला ते रुचत नाही. कारण त्या पात्रतेत त्या तिन्ही संघटना सिद्ध होत नाही.

**मातृ संघटना एक की अनेक?** :- या तीन संघटना एक होत्या तेव्हा सर्व समाज त्यांचे मागे उभा होता. जसे ते फुटत गेले एकाचे अनेक संघटन झाले. अनेक समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा, रिपब्लिकन पक्ष आहेत. तेवढ्याने लोक त्यांना स्वीकारत नाहीत. त्यांची निश्क्रियता, अप्रामाणिकता, बेशिस्तता यामुळे ते बदनाम झाले. आता त्यांचेवर कुणाचाच विश्वास बसत नाही. हीच अवस्था बामसेफ आणि बसपाची आहे. जेवढे तुकडे रिपब्लिकनचे झाले तेवढे तुकडे बामसेफ बसपाचे झाले. यामुळे लोक निराश आहेत.

**मातृ संघटना कशी असते** :- चळवळीचे अनेक विंग असतात. अनेक नावांनी त्या विंग कार्य करतात. त्यांचे तत्व, धोरण, ध्येय एक असते. पण क्षेत्र किंवा वर्ग वेगवेगळा असते. मातृ संघटना त्यांना मार्गदर्शन करते. आदेश देते. त्यानुसार त्या सर्व संघटना कार्य करतात. मातृ संघटनेच्या आदेशाची पायमल्ली कधीच करीत नाही. मातृ संघटनेत त्याग, निष्ठा, समर्पण, शिस्त, ज्ञान, यंत्रणा असते. आंबेडकरी मातृ संघटना या कुठल्याच बाबतीत त्यासारख्या दिसत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केल्या म्हणून तेवढ्यावर भागत नाही. हा भाबलेपणा आहे असेच म्हणावे लागेल.

**आंबेडकर घराणे पर्याय** :- व्यक्तीपूजा ज्या महापुरुषांनी नाकारली त्यांचे अनुयायी लोक घराणेशाही मानायला तयार नाहीत. दुसरा मुद्दा प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी आहे. त्यांची समता सैनिक दल आणि भारतीय बौद्ध महासभा देखील आहे. डॉ. भीमराव आंबेडकर यांची प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टी आणि भारतीय बौद्ध महासभा आहे. आनंदराज आंबेडकर यांची रिपब्लिकन सेना आहे. राजरत्न आंबेडकर त्यांची भारतीय बौद्ध महासभा आणि राजकीय पक्ष आहे. त्यामुळे लोक संभ्रमित आहेत. प्रकाश आंबेडकर यांचे नेतृत्व हा सक्षम पर्याय आहे. परंतु त्यांचेकडून लोकांना अपेक्षा आहेत. त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप या पक्षाची घोड दौड रोखावी. ते संविधान आणि लोकशाही नष्ट करून हिंदू राष्ट्र निर्माण करण्यासाठी संपूर्ण देशात उन्माद निर्माण करीत आहेत. त्यामुळे लोकशाहीवादी लोकांनी त्यांना शत्रू क्रमांक एक मानले आहे. काँग्रेस हा क्रमांक दोनचा शत्रू आहे. पण तो लोकशाही आणि संविधान याचे समर्थन करतो. हिंदू राष्ट्र निर्माण करणे हा काँग्रेसचा कार्यक्रम नाही. त्यामुळे आंबेडकरी चळवळ जर भाजप आणि संघाला एकाकी रोखण्यात सक्षम नसेल तर शत्रूंचा शत्रू हा मित्र या राजकीय तत्त्वानुसार काँग्रेस, कम्युनिस्ट, समाजवादी आणि आंबेडकरवादी यांनी संगनमत करावे असे लोकांना वाटते. ही लोकांची ईच्छा प्रकाश आंबेडकर पूर्ण करीत असेल तर समाज त्यांचे नेतृत्व आनंदाने स्वीकारेल असे लोकमानस आहे. हे केवळ माझे वैयक्तिक मत नाही.

**एक जात संघटन नको** :- आंबेडकरी समाजातील एक वर्ग एक जातीय संघटन करण्यास उबागला आहे. तो सर्व जाती धर्म लोकांचे सोबत राहू इच्छितो. आपली माणसे इतर समाजाचा तिरस्कार करतात. जुन्या अन्याय अत्याचाराच्या आठवणी आणि इतर समाजातील जातीयवादी वर्तन याची ती प्रतिक्रिया आहे. असे असले तरी दलितेतर लोकात अनेक लोक आंबेडकरी चळवळीची समर्थक आहेत. त्यामुळे आपले विचार, वर्तन त्यांना जोडणारे असावे. आपलीही भाषा जर तिरस्काराची असेल तर ही तिस्कराची साखळी कधीच तुटणार नाही. त्याचा परिणाम आपल्या समाजातील एक मोठा वर्ग आपल्या पासून तुटून आणि तो काँग्रेस, कम्युनिस्ट, समाजवादी चळवळीत सहभागी होत आहे. म्हणून आपण आपली चळवळ सर्व जाती धर्माची केली पाहिजे. पण काही लोकांना आपल्या जातीत जे होईल तेवढे उत्तम या विचाराचे आहे. आपल्याला बहुसंख्यांक झाले पाहिजे असे स्वप्न देखील त्यांना पडत नाही. ती एक मोठी समस्या आहे.

**धर्म आणि राजकारण एकत्र करू नये** :- आंबेडकरवादी विचार सर्वच धर्माचे लोक स्वीकारत आहेत. त्यासाठी त्यांना त्यांचा धर्म सोडण्याची गरज नाही. धर्म ही व्यक्तिगत बाब आहे. राजकारण करताना तरी हे पथ्य पाळावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर कांशीराम साहेब आणि प्रकाश आंबेडकर यांनी सर्व समाजाला घेऊन राजकारण केले ही जमेची बाजु आहे. अनेक लोक निळा आणि पंचशील झेंडा जेव्हा एकाच वेळी हाती घेतात तेव्हा ते समीकरण एक जात आणि धर्म घेऊन होते. धर्मनिरपेक्ष राजकारण करण्यात ती मोठी अडचण निर्माण होते. प्रकाश आंबेडकर धर्माचा आधार घेत राजकारण करीत आहे. कांशीराम साहेबांनी ते कटाक्षाने टाळले. म्हणून ते बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले. या नव्या प्रश्नांचा विचार करून नवीन धोरण अवलंबिले तर चळवळीचे पुनरुज्जीवन होईल. तो प्रयत्न आज नाही तर उद्या केव्हा तरी करावाच लागेल. ते होईल असा आशावाद ठेऊ. प्रश्न कितीही असू द्या त्यावर उत्तर असते. स्वाभिमानी आणि बुद्धिमान लोक ते उत्तर शोधत असतात. आपल्या चळवळीत ती क्षमता आहे. म्हणूनच मोदींची 400 पारची धज्जी आपणच उडऊ शकलो. धृवीकरण होईल यावर विश्वास ठेऊ. ■ ■

# ग्रंथसंपदाच्या सहवासात




**डॉ.** बाबासाहेब आंबेडकर हे धर्मशास्त्रवेत्ता तर होतेच त्यासोबत पुस्तकप्रेमी सुद्धा होते हे जगजाहीर आहे. ते दिवसातून 20 - 20 तास खुर्चीवर बसून अध्ययन करायचे. ते म्हणत - माझे मन कशातही रमले नाही तर मी पुस्तके वाचन करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाचलेल्या ग्रंथाचा आकार, रंग नि त्यातील प्रकरणे यांची साग्रसंगीत आठवण असे. त्यांचा ग्रंथाविषयी हव्यास गंगा नदीच्या पाण्यासारखा अखंड वाहत, वाढत होता. त्यांच्या संग्रही हजारो ग्रंथ होते. त्यात जगातील दुर्मिळ ग्रंथ होते. ग्रंथ म्हणजे त्यांच्या जीवनाचा श्वासोच्छ्वास! ते म्हणत - ग्रंथ संग्रह जाणे म्हणजे माझ्या कुडीतून प्राण जाणेच होय. त्यांच्या ग्रंथालयातील ग्रंथांना कुणालाही हात लावण्याची परवानगी नसे. 'जर माझ्या ग्रंथावर बेलीफ जप्ती घेऊन आला तर त्याने पुस्तकाला हात लावण्यापूर्वीच त्याला मी तत्क्षणी यमसदनास पाठवीन.

संदर्भ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र. लेखक - धनंजय किर. पृष्ठ. क्र.526 - 527. पैरा - शेवटचा. पहिला - दुसरा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी ग्रंथसंपदा विषयी विदेशातील विचारवंत लेखकांची यांची काय मते ते जाणून घेऊ या पहा - 'ग्रंथाच्या संगतीत राहण्यासाठी मी सर्वस्वाचा त्याग करीन'.
लेखक - रोमन वक्ता नि मुत्सद्दी सिसिरो.
'भारतातील सर्व संपत्ती माझ्या ग्रंथाच्या आवडीपुढे क्षुद्र आहे.' लेखक - इतिहासकार गिबन.
जर ग्रंथ वाचावयास मिळणार नसतील, तर मी राजा सुद्धा होणार नाही. लेखक - पंडित मेकॉले, इंग्लंड.
आपल्या आयुष्यातील जीव जीवश्चकंठश्च ग्रंथरूपी मित्राचा शेवटचा दुःखद निरोप घेतेवेळी सर वॉल्टर स्कॉट ठसठसा रडला. तसेच आपली दृष्टी जाणार या भीतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकदा अतिशय रडले. कारण मग जीवित इतिश्री करीन असे ते म्हणत.
संदर्भ - उपरोक्त. पृष्ठ. क्र.527. पैरा - दुसरा.

हंसराज कांबळे
मो.8626021520

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विद्येचे आणि पुस्तकाचे किती वेड होते त्यांच्याच लिखित पुस्तकातून जाणून घेऊ या ते म्हणतात - 'माझ्या विद्येचे वेड भयंकर आहे. ब्राम्हणांच्या घरी नाहीत इतकी पुस्तके आता दिल्लीला मज जवळ आहे. एकूण 20,000 पुस्तके मजजवळ आहेत. कुणा ब्राह्मणाजवळ दाखवून द्यावीत. एवढे जेव्हा पुस्तकावर प्रेम होईल तेव्हाच तो विद्येचा खरा पुजारी होईल. मी विद्येची पूजा 24 तास करतो.
संदर्भ - खंड - 18 भाग - 3 पृष्ठ. क्र.403.
म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्रिवार वंदन! ■ ■

अलीकडे एक तक्रार मोठ्या प्रमाणात आढळते की, युवा वर्ग, मूल बुद्ध तत्वद्यान किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य वाचत नाही. याबाबत खरेतर पालकांनी आपले आत्मपरीक्षण केले पाहिजे. जर एखादी व्यक्ती पुस्तक खरेदी करणारी असेल तर ती घेतलेली पुस्तक आपल्या पाल्यांसमोर किती काळ वाचन करते ? पुस्तक घराची शोभा वाढवतात तशीच वैचारिक श्रीमंती प्रदान करतात याची जाणीव जेंव्हा पालकांना होईल तेंव्हा ते पाल्यात रुजेल हे नैसर्गिक सूत्र आहे.

# वाचन संस्कार रुजविण्यासाठी...

**पा**लक जर संपत्ती जमा करण्याच्या मागे धावत सुटला असेल, पालक पुस्तकांची चर्चा करण्यापेक्षा 'बँक पासबुक' चर्चेत रमत असेल किंवा आपल्या पाल्यासमोर त्याच चर्चा करीत असेल तर तो वेगळा विचार कसा करेल. वाचन संस्कार हा त्याच्यात रुजवण्यासाठी आपण काय प्रयत्न करतो हे अधिक महत्वाचे. माझे काही मित्र आहेत. कधी फोनवर बोलणे झाले तर अलिकडे काय वाचलेस किंवा वाचत आहेस याची आवर्जून चर्चा होते. आम्ही काही पुस्तकांची नाव सुचवतो. विचार करा, असा प्रश्न आपण कधी केला आहे ? माझी मुलगी अस्मिता नवव्या वर्गात असतांना उन्हाळी सुट्टीत तिला वेळ घालवण्यासाठी पुस्तक वाचण्याचा सल्ला दिला. तिला 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' हे पुस्तक दिले. पुस्तक मोठे बघून तिची प्रतिक्रिया सकारात्मक जाणवली नाही. मी म्हणालो, 'प्रयत्न कर, जेवढ शक्य होईल तेवढे वाच.' थोड्याच दिवसात ती काही पाने वाचून थांबली. इंग्रजी माध्यमातून शिकत असल्याने मराठी शब्द वाचायला आणि समजायला अडचण येत असल्याचे माझ्या लक्षात आले. मी मग छोटी कथांची, जीवनचरित्र अशी पुस्तके सहज दिसतील आणि इच्छा झाली तर चाळेल, वाचायला लागेल असा विचार करून समोर ठेवली. हळूहळू हा प्रयोग यशस्वी होत होता. एखादा चांगला लेख तिला आवर्जून वाचायला देऊ लागलो. घरी मित्र आले की चर्चा व्हायच्या. त्या चर्चेतल्या काही मुद्द्यांवर ती मला विचारू लागली. हा अनुभव सुखावणारा होता. आता ती मला पुस्तकांची नाव विचारते. अलिकडे मी तिला अभिनेता अमोल पालेकर याचे 'ऐवज.. एक स्मृतिबंध' हे पुस्तक वाचायला सुचवले. कर्णाच चरित्र असलेले रणजीत देसाई यांचे 'राधेय' पुस्तक वाचायला दिले. आवडीने सवड काढून तीच वाचन सुरू आहे. प्रवासात पुस्तक सोबत ठेवते. मला आनंद होतो. तिचे बघून भाची श्रुतीतही ही रुची निर्माण झाली. तिला इंग्रजी पुस्तकांची आवड असल्याने त्याचे कलेक्शन ती करते. यात एक भाग महत्वाचा तत्त्वज्ञानावरील पुस्तक सुरवातीलाच हाती पडली की थोड समजायला जड जाते. भाषा बोजड असली तरीही त्रास येतो. त्यामुळे वाचन गोडी वाढवण्यासाठी सहज सोपी, आकलन होईल अश्या भाषेतील पुस्तके वाचायला मुलांना प्रवृत्त केले पाहिजे. त्यातून जिद्यासा निर्माण होऊन ते आपला वाचन विषय समृद्ध करीत जातील. आम्ही आकाशवाणीत हिंदी सप्ताहाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यात वक्त्याने सांगितले होते की, 'देशात दोन राज्यात किराणा सामान यादीत पुस्तक नोंदण्याची प्रथा आहे. ती राज्ये म्हणजे केरळ आणि पश्चिम बंगाल.' हा संदर्भ पुढे एका अग्रलेखातही वाचनात आला होता. आपल्या आर्थिक शक्तीनुसार ते पुस्तके दर महिन्याला घेतात. अर्थात जशी पोटाची भूक भागवतात तशीच मेंदूची मशागत केली जाते. ही त्यांची सवय अनुकरणीय अशी नक्कीच आहे. नव्या युवा पिढीचे प्रश्न वर्तमानात किचकट आहेत. बेरोजगारी हा विषय गंभीर आहे. समाज माध्यमांनी त्यांच्यावर गारूड घातले आहे. त्यातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. त्या दोन राज्यातील प्रयोगाची आपण किमान सुरुवात तर करू शकतो. महिन्याभरात अनेक काम नसलेल्या बाबी आपण मागवतो. ऑन लाईन सामानाची क्रेझ आहे. यासोबत अशी छोटी छोटी जीवनचरित्र, बोधप्रद गोष्टींची पुस्तक खरेदी करण्याचा प्रयत्न आपण नक्की करू शकतो. त्यामुळे बालवयात मुलांना गोडी निर्माण होऊ शकते. विद्याने विषयक पुस्तक मुलात रुची निर्माण करू शकतात. याला खर्चही फारसा येणार नाही. वाचन ही आपली गरज आहे हे पाल्यांत बिंबवण्याचे उत्तरदायित्व पालकांचे अधिक आहे. या महिन्यात आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त त्यांना अभिवादन करणार आहोत. डॉ. आंबेडकर यांच पुस्तक आणि वाचन प्रेम आपण जाणतो. स्वतःचे ग्रंथालय त्यांनी उभारले. तो आदर्श ठेऊन, किमान त्यादिशेने भावी पिढीला वळवणे आपली सामुहिक जबाबदारी आहे याची खुणगाठ बांधूया, किमान सुरवात तर करून बघूया. ■ ■






अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

अलिकडे प्रकाशित डॉ. आंबेडकरांची मीमांसा 'साहित्य मीमांसा' व 'बुद्ध आणि नदी' खरात या शिर्षकांतर्गत महान संस्कृतीचा विकास हे डॉ. प्रकाश लिखीत दोन विचारधन पुस्तक रुपात वाचकांच्या हाती आलीत. त्यांच्या लिखामाचे विषय प्रामुख्याने युगप्रवर्तक महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागतांचा मानवतावादी बुद्ध धम्म असला तरी मराठी साहित्य क्षेत्र त्यांच्या चिंतनातून सुटले नाही. कवी, कादंबरीकार, लेखक, समीक्षक या अर्थाने मराठी साहित्य समृद्ध केले. सामान्यता साहित्य लेखन करणारे काव्य निर्मितीपासून अलिप्त राहत असले तरी डॉ. खरात मात्र या बाबतीत अपवाद ठरल्याचे 'नव्या सूर्याचा आदिबंध' या काव्यसंग्रहाच्या अलिकडील प्रकाशनातून लक्षात येते. या काव्यसंग्रहातील बहुतांश कविता सामाजिक आशयाने प्रभावीत असल्याने पददलितांच्या वेदनेशी समरस होणारी कवीच्या मनातील तळमळ प्रकर्षाने जाणवते. सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून कवी मन अलगद बाहेर येते व मातृत्व अऋण 'आई' या कवितेतून प्रगट करायला विसरत नाही. कविता वृत्तालंकाराच्या संकीर्णतेत बंदिस्त न राहता मुक्तछंदातून प्रगर व्हायला लागते, ही आंबेडकरी साहित्याची देण डॉ. खरातांच्या कवितेतून व्यक्त होतांना दिसते.

# डॉ. प्रकाश खरातांची साहित्यनिर्मिती व दिशा

**डॉ.** खरातच्या साहित्यिक व्यक्तिमत्वाचा प्रारंभ 'अंधाराच्या अस्त' या कथासंग्रहाच्या प्रकाशनातून 1993 साली झाला. त्यात समाविष्ट असलेल्या कथेतून तळागाळातील उपेक्षिताविषयीची त्यांची तळमळ प्रसिद्धीच्या झोतात नेण्यास समर्थ ठरली. या कथासंग्रहातील 'शेणातील दाणे' या कथेतून भूकेनी व्याकूळ अशा दयनीय अवस्थेचे संवेदनशील मनाला द्रवित करणारे मार्मिक चित्रण रेखाटले गेले. लेखकात असलेला संवेदनशील मनाचा हा वारसा आंबेडकरी चळवळीशी समरस होवून पददलितांच्या व अशिक्षितांच्या मुक्तीकरिता साहित्य निर्मिती हा भाव त्यांच्या लिखानातून उत्तरोत्तर विकसीत होत जातो. स्वातंत्रपूर्व काळातील 'कलेकारिता कला व जीवनाकरिता कला' या कलावादी व जीवनवादी साहित्य द्वंद्वाला लोकशाही मूल्याची सांगड घालणारे साहित्य साठोत्तरीनंतरच्या काळात आंबेडकरी साहित्य प्रवाह म्हणून उदयास आले, त्यामुळे प्रस्थापितांचे हितसंबंध जोपासण्यापुरती साहित्य निर्मिती सिमीत न राहता बहुजनांच्या हिताचे हारीने अज्ञान, अंधश्रद्धा, अंध विश्वास, रुढीवादीता, दैववाद यातून बाहेर काढून बुद्धीवाद आणि विवेक जागविण्यास अग्रेसर ठरली. सामान्य माणसात धर्माधतेने निर्माण झालेली स्थितीशीलता बदलून जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात गतिशीलता वाढायला लागली ही आंबेडकरी साहित्य विचाराची पेरणी डॉ. खरातांच्या साहित्य कृतीतून प्रगट होतांना दिसते. साहित्य निर्मितीकरिता भाषा समृद्धीवर भर देण्याऐवजी बहुजन सुखाय या आशयाची मांडणी करणारा विचार व्हावा या अर्थाने लोकभाषेचे समर्थन केले. त्यामुळे जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातून समता व मानवतावाद बळकट करणारी साहित्य निर्मिती व्हायला लागली. त्यामुळे तत्वतिष्टता बाळगून तळगाळातील माणसाच्या वेदलेशी समरस होवून साहित्य निर्मिती हे डॉ. खरातांच्या लिखाणाचे मर्म असून भगवान बुद्धाचा विचार प्रेरणास्थळी आहे.

नव्याने लोकार्पण झालेल्या 'बुद्ध आणि नदी' या साहित्य कृतीतून लेखकाने लोणी निर्मिती कालखंड, राजाश्रय, धम्म प्रबोधन, जीर्णावस्थेचे दर्शन या पुस्तकातून घडविल्याचे दिसते. बुद्ध संस्कृतीच्या अभ्यासकांना ते सहाय्यक ठरेल. भगवान बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या अस्थीचे कपीलवस्तूचे शाक्य, पानाचे मल्ल, कुरशीनारेचे मल्ल, वैशालीचे लिच्छवी, मिथीलेचे विदेह, रामग्रामचे कोलीय, केसपुत्तचे कालाम, भग्गाचे भार्गव या आठ गणराज्यात वाटप करण्यात आले. विप्पलवनचे मौर्य उशिरा आल्यामुळे साथ वितेची राख न द्रोण योना राखपाच देण्यात आले. त्यावर या श्रद्धावान हितचिंतकांनी त्यावर स्तुपाची निर्मिती केली. बुद्ध अवशेषावर स्तूप, विहार चैत्य, संघाराम निर्मिती केली. तेंव्हापासून उदयास आली. हा उपक्रम उत्तरोतर देशाच्या विविध भागात धम्म प्रचाराबरोबर विकसीत झाला ही महान संस्कृती अकराव्या शतकापावेतो अस्तित्वात होती. वेळोवेळी झालेल्या परकीय आक्रमणामुळे व ब्राम्हणी संस्कृतीच्या प्रभावात लोप पावळी. आज तिचे अवशेष उत्खनातून जागोजागी सापडतात- बुद्धाच्या जीवनकाळात सारिपुत्त, मौदगल्यामन, महाकश्यप, राहुल, आनंद, उपाली, अनिरुद्ध, महाप्रजापति गौतमी, यशोधरा इत्यादी अनेक भिक्खू-मिनसूनीचे बुद्ध धम्माच्या प्रचार प्रसारात मोलाचे योगदान लाभल्याचे सविस्तर वर्णन लेखकानी या पुस्तकातून केले आहे. बुद्ध धम्माला राजाश्रय दिलेल्या बिंबीसार, अजातशत्रू, प्रसेनजीत, सम्राट अशोक, कनिष्क, पाल, हर्षवर्धन, सातवाहन, वाकाटक इत्यादी राजवटींचा उल्लेख करून त्यांच्या राजवटीत बुद्ध विचार समृद्ध झाल्याचे मत मांडले आहे. त्याचप्रमाणे अर्वाचीन भिक्खू व बुद्ध विचारवंत धम्मानंद कोसंबी, जगदीश काश्यप, राहुल सांकृत्यायन, आनंद कौसल्यायन, डॉ. आंबेडकर यांच्या धम्म योगदानाची, दखल घेण्यात लेखक कमी पडले नाही.




बुद्ध लेण्यासंबधी लेखकानी काढलेल्या निष्कर्षानुसार बुद्ध संस्कृतीच्या पन्नास टक्के लेण्या एकट्या महाराष्ट्रात असल्याची साक्ष भाजे, काळे, पितळखोरे, अजिंठा, वेरुळ, औरंगाबाद, कान्हेरी, सालबर्डी, भद्रावती, शिवनेरी, जुन्नर, पुणे, नाशिक, महाड, लोणार, रामटेक, पवनी येथील लेण्या बुद्ध संस्कृतीची महानता दर्शवितात. महाराष्ट्रातील राजे सातवाहन आणि वाकाटक यांच्या काल किर्दीत बुद्ध धम्म मोठ्या प्रमाणात पसरला. स्तूप, चैत्य, विहार, संघाराम यात वास्तव भिक्खू वास्तव करीत व परिसरातील लोकाविषयी अनुकंपा बाळगून त्यांना दुःख मुक्तीच्या मार्गाची शिकवण देत असल्याची लेखकाने केलेली मांडणी इतिहासाला व वास्तवतेला धरुन आहे. (या बहुतांश लेण्या नदीकाठी भिक्खू निवास, साधना, धम्माचरण, धम्म प्रबोधन यांच्या केंद्रस्थानी असून नदीकाठी असल्याने धम्म आणि नदी हे अतूट नाते मानून आहे. बुद्ध संस्कृतीची ही इतिहासजन्य बांधणी बुद्ध आणि नदी या शिर्षकात टोळेबंध करून लेखकाने बुद्ध अभ्यासकाच्या स्वाधीन केली आहे? महाराष्ट्रातील या लेण्याव्यतिरिक्त कृष्णा गोदावरी नदी काठचे बुद्ध विहार व स्तूप, गुरूर जिल्ह्यातील नागार्जुन कोंडा येथील कृष्णा नदीकाठी असलेले स्तूप, लेविनी येथील तिहार-मेल नदी काठचे सूप, गोदावरी काठची लेणी, ग्रीक राजा कनिष्क यांच्या राजवटीत लडाख काश्मीर येथील लेणी तसेच उत्तर प्रदेश, बिहार येथील लेण्या यांचा परामर्श लेखकाने घेतला आहे. पर्यटनाचे इष्टीने बुद्ध संस्कृतीचे हे विस्तृत दर्शन मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही. भिक्खू निवास, साधना कक्ष, धम्माचरण, धम्म प्रबोधन यांच्या केंद्रस्थानी बहुत लेण्या असून त्या नदीकाठी असल्याने बुद्ध आणि नदी यांचे अतूट नाते असल्याचे मत लेखकाने केले आहे. त्यामुळे बुद्ध संस्कृतीची ही इतिहासजन्य बांधणी लेखकाने 'बुद्ध आणि नदी' या शिर्षकात राळेबंध करून बुद्ध अभ्यासकांचे स्वाधीन केली आहे. भारतात बुद्ध धम्माच्या ऱ्हासानंतर या लेण्या पूर्णतः दुर्लक्षीत झाल्याने मातीच्या ढिगाऱ्यात लुप्त झाल्यात तर कांही काळप्रवाहात जीर्ण होवून नष्ट झाल्यात. ब्रिटीश अधिकारी अलेक्झांडर कलींगहम यांनी पृथ्वीच्या पोटात लपलेला हा भारतीय संस्कृतीचा वारसा उत्खननाद्धारे उजागर करून त्यांच्यात जीवंतपणा निर्माण केला. जगप्रसिद्ध अजिंठा लेण्या त्यांच्या परिश्रमाची संशोधक दृष्टीची दादरेत भारतीय पुरातत्व विभागाने देशात काही ठिकाणी उत्खनन करून बुद्ध संस्कृतीची विरासत स्वकीयांच्या स्वाधीन केली. भारत बुद्ध संस्कृतीच्या गौरवाचे प्रतिक अर्वरित अवशेषातून त्याची भव्यता आणि दिव्यता प्रगट करतात. लेण्यातून भारतीय स्थापत्य कला, शिल्पकला, चित्रकला याचे अविस्मरणीय दर्शन घडते. भारतातील बुद्ध संस्कृतीच्या चैत्य, लेण्या, विहार, संघाराम स्वरुपात असलेल्या लेण्यांचे देवालयात रूपांतर करून देव देवतांच्या मूर्त्या बसविल्या तर काही ठिकाणी बुद्ध मूर्त्यांना वस्त्र नेसवून देवीचे नाव देण्यात आले. लोणावळ्याची एकविरा देवी हे एक प्रतिक आहे काही लेण्यांना पांडव लेण्या म्हणून नवी ओळख देण्यात आल्याची नोंद लेखकाने घेतली आहे. पंढरपूरचे विठ्ठल रखुमाई देवालय मूळचे बुद्ध असल्याचे बुद्धरूप असल्याचे विधान सम्म पुंडरिक या बुद्ध ग्रंथाच्या आधारे व्यक्त केले आहे. लेखकाने 'मिलींद पैन्नाह' या ग्रंथाचा उल्लेख करून राजा मिलींद आणि गियरक नागसेन यांच्यात झालेल्या अभिधम्मपिटकातील दुर्बोध दार्शनिक विषयाकडे लक्ष वेधले. अथांग ज्ञानाच्या या थोर विद्वानाची प्रेरणा सतत स्मरणात रहावी या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद येथील कॉलेजला 'मिलींद' आणि परिसराला 'नागसेन वन' नाव देवून बुद्ध दार्शनिकतेची महानता विषब्द बोली बुद्धाच्या जीवनकाळात अनेक उपासक, उपासिका प्रसेनजीत होवून 'अत्त दीपो भव' या प्रेरणेनी स्वतः घडले व अरहंत अवस्था गाठली. स्त्री वर्ग देखील धम्म आचरणात कमी पडला नाही. त्यांनी देखील भिक्खूनी संघ निर्माण करुन निर्वाणाची उच्च अवस्था गाठली. त्यांच्या धम्मविषयक योगदानाने प्रभावित होवून 'यशोधरा' ही स्वतंत्र कादंबरी लिहून बुद्ध शासनात 'भद्राकांचना' या उपाधीने गौरविलेती ही नायिका स्वाभिमानाचे प्रतिक असल्याचे लेखकाने मत व्यक्त केले आहे. तिच्या जीवनगाथेतून समर्पित भावाची मांडणी करून बुद्ध शासनातील मानवी समतेला लेखकांना उजागर केले आहे. तथागताच्या स्वगृही भेटी संदर्भात तिने प्रथमदर्शनी दिलेला नकार अहंकार नसून स्वाभिमानातून प्रगर होणाऱ्या व्याकूळ मनाचे प्रतिबिंब होय तथागताजवळ असलेल्या अक्षय नीधीत वारसा म्हणून हक्कमाग अशा प्रकारचा राहुल केलेला उपदेश समर्पणभाव दर्शवितो. सनी देखील बुद्ध शासनात उच्च अवस्था प्राप्त करू शकतात है. मानवी समतेचा बुद्ध विचार मांडला आहे. यशोधरेचे व्यक्तिमत्व, त्याग आणि बुद्ध शासनातील तिचा समर्पणभाव लेखकाने अगदी सरळ सोप्या भाषेत प्रवाहित करून नाईकेच्या माध्यमातून बुद्धविचार जनमाणसापर्यंत पोहोचविण्यात लेखक यशस्वी ठरल्याचे संकेत कादंबरीतून प्रगट होतांना दिसतात. ■ ■

ॲड. मदन उके
मो. 9923282528

# ‘युद्धपोत’ - ‘उजेडा’चा जयघोष करणारी कविता

*‘युद्धपोत’ हा कवी बळी खैरे यांचा प्रथम काव्यसंग्रह आहे. यात एकूण 53 कवितांचा समावेश आहे. आपल्या देशात ‘चैतन्यवाद’ विरुद्ध ‘जडवाद’ हा तात्विक संघर्ष जुनाच आहे. या पार्श्वभूमीवर कवी बळी खैरे यांचे चिंतन लक्षणीय आहे.*

खरेतर जडवादाने नेहमीच अस्तित्ववादाच्या दृष्टिकोनातून कृतिशील - रित्या विचार केलेला आहे. ‘माझी कविता’ नेमकी कशी आहे, याविषयी आपले काव्यात्म चिंतन प्रतीत करताना कवी म्हणतात,

*‘माझ्या मेंदूत एक कविता आहे*
*कवितेच्या पोटात एक पिल्लू*
*एका लख्ख उजेडवेळी प्रसवते*
*मेंदूतली कविता,*
*तिच्या अर्भकाला जाणिवेच्या*
*निखाऱ्यावर भाजायची,*
*अनुभूतीच्या पाण्यात बुडवून*
*त्याच्या मेंदूवर नीतीमूल्यांचे घण मारायची;*
*त्याला ‘वज्र’ बनवायची’ जबाबदारी आहे*
*माझ्या कवितेवर.’*

लोकशाहीत लोकांच्या मतांना मोलाचे स्थान असते. मात्र अलीकडे लोकशाहीचे स्वरूप भिन्न दिसते, तेव्हा कवी मन उद्विग्न होते. ही उद्विग्नता ‘लोकशाहीशी संवाद’ या कवितेत कवीने व्यक्त केली आहे. कवी म्हणतात,

*‘तुला कसे सांगावे लोकशाही की,*
*कल्पांत रितेपण भरले आज*
*काठोकाठ अंत:र्बाह्य आणि,*
*उद्याचा दिवस दुरून आकारतो नसानसांत*
*आक्रंदून. निव्वळच रक्तभार लेऊन*
*पहाट उगवते*
*मनाच्या उदास एकाकी माळरानावर.*
*घुसमटणारे अथांग व्याकुळ क्षण वाहणारी*
*आयुष्याची रक्तझोळी नि तिच्यात*
*निरंतर रित्या होणाऱ्या वेदनांच्या पखाली.’*

आपल्या बाहूत प्रचंड शक्तीचे बळ यावे. त्यासाठी योग्य ठिकाणी पुनर्वसन होणे गरजेचे आहे. आपल्या भूतकाळाचे स्मरण झाले की, आपली घायाळ अवस्था नजरेसमोर तरळून जाते. अर्थातच आपली पूर्वावस्था मानवी मनाला बेचिराख करते. आपल्या गावाच्या रस्त्याच्या दिशेने योग्य पाऊल पडावे, असे मनापासून वाटते. कवी ‘पुनर्वसन’ या कवितेत म्हणतात,

‘शोधून कुठे शोधावा घायाळ
मनाचा दिलासा,
शब्दाशब्दांच्या आडोशाने
हलाहल ओकणारे अलवार
डंख किती- किती म्हणून
जपावा विचारांच्या ओंजळीने
मनाच्या कोनाड्यात थरथरतो
दिवा. काळोख पुढे ठाण
मांडून बसलेला अन् वादळाच्या वस्तीतून जाणारा
माझ्या गावचा रस्ता आता समुद्रालाही बांध
घालील इतके बळ कमावू दे बाहूत गावापर्यंत
अजूनही नजर भिरभिरते माझी.’



मानवी जीवनात सारखी उपेक्षा जेव्हा होते, तेव्हा मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. शोषित, पीडित समाजाच्या बाबतीत हे नवे नाही. मात्र अशाही अवस्थेत एखादा डोंगर पोखरून रस्ता घडविणारा ‘बापमाणूस’ पराक्रम घडवतो तेव्हा निश्चितपणे वाटते.

*‘आणखी काय हवे मला?’,*
*असे मला सहज वाटून*
*जाते. कवी अंतर्मुख होऊन*
*विचार करताना ‘बाप’ या*
*कवितेत म्हणतात,*
*‘म्हणता म्हणता त्याने डोंगरच पोखरला*
*आणि माझ्या पावलांपुढे रस्ता घडवला*
*अंधारातून उजेडाकडे नेणारा-आणखी*
*काय हवे मला?...*
*जेमतेम आकारायला लागली पावले*
*तेव्हा पोरका झाला म्हणतात माझा बाप*
*मग तमाम उपेक्षा/अवहेलनांच्या कडेकडेने*
*हटवाद्यासारखा जगणे रेटत राहिला*
*प्रश्नांच्या हलत्या फांदीवरच त्याने खोपा*
*बांधला.’*

**समीक्षा**



**दिनेश कोटांगले**
**मो.9834492541**

‘बाबासाहेब’ म्हणजे, थकल्या जीवांसाठी जिद्दीचा प्रचंड पहाड. खरेतर डॉ. बाबासाहेबांचे कर्तृत्व शब्दात मोजता येणार नाही. तळागाळातल्या माणसांना स्वाभिमानाने उभा करणारा महापराक्रमी योद्धा. अशा महायोद्धयाच्या क्रांतिकार्याला अभिवादन करताना कवी म्हणतात,

**‘तू घडविलेस राखेतून**
**फिनिक्स तू संघर्षाची**
**युद्धशाळा तुझ्या गळ्यात**
**विजांच्या माळा, तू**
**विचारांचे महायुद्ध**
**अनिरुद्ध केल्यात ज्यांनी**
**माणसांसाठी**
**माणुसकीच्या वाटा**
**त्यांच्या रेताळ**
**तत्त्वज्ञानावर तू महाप्रलयी**
**लाटा अन् आभाळ तुझ्या**
**कविता**
*तू सूर्य तेजाळून उठलेला*
*अंधाराच्या गुहेत शस्त्रांचेही शस्त्र तू,*
*शास्त्रांचेही शास्त्र तू अज्ञानाला जाळून गेले,*
*ज्ञानाचे वज्रास्त्र तू विषमतेच्या अंगांगावर*
*तू जखमा तू घाव तू सखा समतेचा, तू*
*करुणेचे गाव तू तुडविलेस*
*काळाराम, तू पेटविले महाड*
*तू थकल्या जिवांसाठी*
*जिद्दीचा प्रचंड पहाड.’*

प्रस्तुत काव्यसंग्रहाला प्रसिद्ध समीक्षक डॉ. अशोक नामदेव पळवेकर यांची दीर्घ प्रस्तावना लाभली असून त्यांनी संपूर्ण काव्यसंग्रहाचे समुचित शब्दात वर्णन केले आहे. डॉ. अशोक पळवेकर म्हणतात, ‘युद्धमनस्क जाणिवांचे युद्धपोताचे सर्व ताणेबाणे सिद्ध करीत प्रभुसत्तावादी व्यवस्थेविरुद्ध संघर्षसज्ज होण्याचा युद्धमंत्र तिच्या रणभेरीतून समूह मनात निनादून टाकते.’ अर्थातच विषमतेविरुद्ध शोषितांनी संघर्षरत राहिले पाहिजे. गंभीर विचारविश्वाला जन्म प्रेरणा ठरणारी, ही कविता आहे. कवी बळी खैरे हे जागतिक कीर्तीचे चित्रकार आहेत. त्यामुळे एका मनस्वी कलावंताचे मनोगत सदर काव्यसंग्रहातून प्रकट झाले आहे. तसेच काव्यसंग्रहातील रेखाटणामुळे काव्यसंग्रहाला सौंदर्य प्राप्त झाले आहे. सदर काव्यसंग्रह रसिकांनी आपल्या संग्रही ठेवावा.

‘युद्धपोत’(काव्यसंग्रह)
कवी- बळी खैरे (मो.9420117022)
प्रकाशक-विद्यार्थी साहित्य प्रकाशन, यवतमाळ.
पृष्ठ- 84 ■ ■

## काव्यफुले



संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

### म. फुले ( सिनेमा)

शेण मातीचे गोळे सावित्रीने झेलले
अंगावर एक, दुसरे पिशवीत लुगडे
अतिश्रमाने तिने भारतीय स्त्रीस घडविले
हे त्रिकालाबाधित सत्य जगास असे ठावे
विरोध कां करता, असता, असंख्य पुरावे
हे ऐतिहासिक सत्य कां दडपून पाहे?
`आम्हां सर्वांवर, फुलेंचे उपकार',
तुच बोलली बाई हे सत्य डावलून,
कशी होशिल उतराई?
शेण गोळे विसरून, भिडे वाडा, स्मरशी?
ब्राह्मण सभेची तूं, पदाधिकारी, जरा
मनाशी विचारी फूले, आंबेडकरांनी आधी,
आजी, पणजी, कशी होती?
चूल मूल, वैध्यव्य, केशवपन,
बालविवाह, कशी जगली?
मातृहत्या परशुरामाची का देशी
ललकारी?
`फुले' सिनेमाचा संबंध काय,
परशुरामाशी?

अहिंसेवर काय, हिंसा वरचढ झाली?
बहुजनांवर ,तीन टक्के का पडती भारी?
जय श्रीराम `देवून घोषणा, काय सांगू
पाही जनतेला?
`रघुकुल रीती सदा चली आयी
प्राण जाये पर वचन न जारी'
वरील देता ग्वाही, राम सत्याग्रही
मग, शेण गोळ्याचे सत्य कां पचत नाही?
सीतेला धाडिले वनीं, गर्भारपणी
निर्दोष शंबूक मारिला निर्दयपणे
असे `रामराज्य' हवे आपणाशी
आम्हा हवी संविधानिक लोकशाही!
संविधानिक लोकशाही, संविधानिक
लोकशाही!!

- **सुधा बामनपल्लीवार**

### तो पुन्हा आलाय्

तो पुन्हा आलाय, तो पुन्हा आलाय,
पुन्हा आलाय् !
तो पेशवाईतील
साडेतीन शहाण्यांपैकी अर्धा !
तो सनातन इतिहास पुरुष
पुरुषसुक्ताच्या उद्‌गाता
वंश श्रेष्ठत्वाची वज्रमुठ उंचावत
`अहंब्रम्हास्मी' ची गर्जना करत
तो नव्या निर्धाराने आलाय् !
तो पुष्यमित्र शुंग
एक छद्म मी कुटील सेनापती
बृहदरथाचा मुडदा पाडून
तथागताच्या धम्माला
हद्दपार करण्यासाठी
तो पुन्हा आलाय् !
शिवबांच्या सर्वसमावेषक
क्रांतीला, खिळ घालण्यासाठी
प्रतिक्रांतीचा हा संवाहक
पेशवाईचे वस्त्र परिधान करून
पुन्हा आलाय् !
मनुस्मृतीला स्मरून
संविधानाचे धींडवडे काढत
समता, स्वातंत्र्य, न्यायाला
मुठमाती देण्यासाठीच
समरसतेचा भुलभुलैया घेऊन
धर्मनिरपेक्ष लोकशाहीवर
हल्लाबोल करत तो पुन्हा आलाय् !
ज्योतिबा, शाहू, बाबांना
`चौकटीत' बसवण्याच्या घेतला वसा
गांधी, नेहरूंचा पुसायचाय
त्याला कायमचा ठसा
`संभवामी युगे युगे' चे स्मरण करत
भिमा-कोरेगावच्या बदला घेण्यासाठी
तो पुन्हा आलाय् !

- **पुरुषोत्तम भिसीकर**

### मन हे अशांत आहे

चर्चा निवडणुकीची, अगदी भरात आहे
हमला पहेलगामी, झाला अशात आहे
असतील कोण जे ही, शोधा मुळं तयांची
व्हावी तयांस शिक्षा, चर्चा जनात आहे
बदनाम कौम सारी, करणे उचीत नाही
करतात राजकारण, ते ते भ्रमात आहे
रक्षेत चूक झाली, केले कबूल त्यांनी
गाणे तरी मिडीया, गातो सुरात आहे
वादात मी पणाच्या, भरणार पोट कसले
चिमणी मुले उपाशी, त्याही घरात आहे
माणूस तो कुणाशी, करणार वैर नाही
करुणा तथागताची, ज्याच्या मनात आहे
सांगा कुणी तरीही, माझा निरोप त्यांना
झाला `अरूण' दुःखी, मनही अशांत आहे.

- **अरूण विघ्ने**

### भीम सूर्याची किरणे....

गुमान करती सारे - बाबाच्या खजिन्यावर..
जरा चढून दावा - भीम बुध्दाच्या जिन्यावर..
ती गोलमेज गर्जे - साऱ्या जगात भीमामुळे..
साऱ्या भेदांना जाळले - मनुच्या सरणावर..
निसर्ग देणं पाणी - बाट होता अस्पृश्यांना..
आग लावली भीमान - महाडच्या पाण्यावर..
ताबा दगडी देवा - भीम रणशिंग फुंकतो..
समता चढाव काळ्या - रामाच्या मंदिरावर..
संसाधन रेल चेल - प्रस्थापितांच्या ताब्यात..
संविधान भीमाचा ठेवा - भेदांच्या शिरावर..
अतिशुद्रांना जगणे - होते ऊत `रंडी' बुडात..
केली धम्मक्रांती भीमान - त्या दीक्षाभूमिवर..
आहे बावीस प्रतिज्ञा - भीम सूर्याची किरणे..
उजेड देती मानवा - मुक्तीच्या अंधारावर..
कुठल्या अमिषाला - बळी गेला नाही भीम..
जगला स्वाभिमानात - अखेरच्या श्वासावर..
गुमान करती सारे - बाबाच्या खजिन्यावर ..

- **दिनकर रा. मडकवाडे**

# डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता व त्यानंतरची वर्तमानपत्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि त्यानंतरचे वर्तमानपत्र यावर दैनिक बहुजन सौरभचे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी 14 /4/2025 ला जयंती निमित्ताने भाषण केले. उपस्थित जनतेने त्यांच्या भाषणाला प्रचंड प्रतिसाद दिला. वाचकांसाठी खास वृत्तांत देत आहोत. प्रिय बंधू आणि भगिनींनो, सर्वप्रथम संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता ही सामाजिक वैचारिक क्रांतीची पत्रकारिता होती. या पत्रकारितेने विचारांची दिशा आणि भूमिका स्पष्ट केली होती. त्यांना वर्तमानपत्राची जाणीव होती आणि म्हणून ते स्वतः अग्रलेख लिहीत होते. अग्रलेखात त्यांची भूमिका ठरलेली होती. स्वाभिमानाची भूमिका म्हणजेच एकंदर सामाजिक क्रांतीचा जाहीरनामा होता. इतर वर्तमानपत्र फक्त त्यांच्या वर्चस्वाच्या लढाईसाठी ते जनजागृती करित होते. त्यांची स्वराज्य हाक इंग्रजांपुढे स्वार्थ पोटी होती. देशातील इतर तमाम शोषित, पिढीत, उपेक्षित, बहिष्कृत जे लोक आहेत त्यासाठी ती स्वराज्याची हाक नव्हती तर स्वराज्याची हाक ही आपल्या जात समूहाची वर्चस्वाची लढाई कायम राहावी यासाठी होती. स्वराज्याच्या लढाईत आमचाही वाटा असायला पाहिजे. स्वराज्यात आम्हालाही न्याय मिळाला पाहिजे. यासाठी डॉ. बाबासाहेबांची ही वैचारिक चळवळ होती. माणूस म्हणून अधिकार मागण्याचा लढा होता. खरे तर असेच विषय आंबेडकरी वृत्तपत्राचे होते [टाळ्या] आम्हाला माणूस म्हणून जगू द्या. कारण तत्कालीन काळामध्ये पेशवाई पासून स्पर्श, अस्पृश्य असा जमीन आसमान अंतर असणारे आव्हानच होते. कारण एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला कमी लेखतो, न्याय मिळत नाही. माणसांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. जे पाणी जनावरांना मिळते ते मानवाला काय मिळत नाही? असा प्रश्न जळजळीत त्यांच्या लेखाचा विषय राहात होता. माणसांना माणसांची सावली सहन होत नाही. वर्ण व्यवस्थेचा गोषवारा आपल्या अभ्यासपूर्ण लेखन शैलीत घेतला होता. माणुसकीच्या हक्का साठी, उपेक्षित लोकांसाठी डॉ. बाबासाहेब यांची पत्रकारिता होती. डॉ. बाबासाहेबांनी मूकनायकापासून तर प्रबुद्ध भारतापर्यंत जी काही वर्तमानपत्राची दुनिया उभी केली होती. ही वर्तमानपत्राची दुनिया येथिल दलित, पिडीत, शोषित, उपेक्षित बहिष्कृत लोकांना लोकांच्या वेदना या जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी वृत्तपत्रांमध्ये आपली हयात घालवली.



**26 वर्षापासून भारतीय रिझर्व्ह बँक समोरील संविधान चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन आणि जयंती दिन भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन केल्या जाते.**

डॉ. बाबासाहेबांचे प्रभुत्व इंग्रजीवर होते. परंतु माझ्या महाराष्ट्रातील बांधवांना मराठी भाषा येते म्हणून त्यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत वर्तमानपत्र सुरू केले. मूकनायक वर्तमानपत्राला राजश्री शाहू महाराज यांनी अडीच हजार रुपयांची देणगी दिली. देणगीतून मूकनायकाची वाटचाल सुरू झाली. ही देणगी म्हणजे एक सामाजिक क्रांतीला प्रोत्साहन देणारी देणगी होती. ऑक्टोबर 1920 ला डॉ. बाबासाहेब विदेशात शिक्षणासाठी गेले असताना ते त्या ठिकाणी वृत्तपत्राची दुनिया पाहत होते. वृत्तपत्र दुनियेतून माझ्या समाजाची व्यथा वेदना, अन्याय, अत्याचार आणि त्यांच्या स्वाभिमान जागृत व्हावा यासाठी वर्तमानपत्रासारखी दुसरी दुनियाच नाही हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मनोमन वाटत होते. 31 जानेवारी 1920 ला मूकनायकाचा पहिला अंक मुंबईतून प्रकाशित केला फार काळ मूकनायक जगला नाही. परंतु ऑक्टोबरपर्यंत जे काही अंक प्रकाशित होत गेले. ते सर्व जे सर्व अग्रलेख डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेले होते. डॉ. बाबासाहेबांनी इथल्या मुक्यांना अग्रलेख काय असतात? अग्रलेखाचे वाचन आणि त्यात आपली भूमिका या संदर्भात जनजागृती करण्याचे काम डॉ. बाबासाहेबांच्या अग्रलेखाने केले. डॉ. बाबासाहेबांची पत्रकारिता ही सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जडणघडण करणारी महत्त्वाची होती. त्यानंतर डॉ. बाबासाहेबांनी 3 एप्रिल 1927 ला डॉ. बाबासाहेबांनी पुन्हा बहिष्कृत भारत वर्तमानपत्र सुरू केले. मूकनायकापेक्षा जास्त काळ टिकले. परंतु याही वर्तमानपत्राचा मृत्यू हा पैशाअभावी झाला यातील बहिष्कृत भारत वर्तमानपत्र म्हणजे खऱ्या अर्थाने चळवळीचा एकंदर वृत्तांत काळ म्हणता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारतासाठी आपला पूर्ण जीव ओतला होता. त्या काळामध्ये केसरी ही प्रकाशित होत होता. परंतु केसरीमध्ये उपेक्षित, वंचित, बहिष्कृत लोकांसंदर्भात साधा शब्दही लिहून येत नव्हता ही खंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. डॉ.बाबासाहेबांनी समता, जनता आणि शेवटचा प्रवास तो प्रबुद्ध भारताकडे घेऊन गेला. बाबांची वर्तमानपत्र ही पक्षिक होती. डॉ. बाबासाहेब यांच्या महापरिनिर्वाण नंतर डॉ. बाबासाहेबांचे जे लेकरे होते. त्यांनी अनेक साप्ताहिक काढून आपापल्या परीने वर्तमानपत्राच्या दुनियेमध्ये पाय ठेवल्या. त्यामध्ये चंद्रपूर, मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक, संभाजी नगर सह अनेक जिल्ह्यातून छोटे-मोठे साप्ताहिक, मासिक, पाक्षिक प्रकाशित होऊ लागले. त्यानंतर कांशीराम यांनी वर्तमानपत्रातून बहुजन समाज बनविण्याची एक चळवळ सुरू केली. त्यांनीही भारतातील अनेक भाषेत साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून चळवळ मोठी होत होती तेव्हा त्यांना दैनिकाची जाणीव निर्माण झाली त्यांनी बहुजन टाइम्स नावाचे दैनिक नागपुरातून प्रकाशित केले. उपेक्षित बहुजन समाजातील लोकांत विश्वास निर्माण केला की आम्ही हे करू शकतो. आम्हीही दैनिक काढू शकतो. परंतु पैशाच्या अभावी वर्तमानपत्र बंद झाले. त्यानंतर चळवळीने विश्वास निर्माण केला. फुले, शाहू, आंबेडकरांच्या लेकरांनी मुंबईतून दैनिक सम्राट नावाचा वृत्तपत्र सुरू झाले. सम्राटला प्रचंड असा प्रतिसाद मिळाला आजही हे वर्तमानपत्र सुरूच आहे. याचबरोबर संपूर्ण महाराष्ट्रातून दैनिक जनतेचा महानायक ही प्रकाशित होऊ लागला. परंतु कोरोना काळामध्ये अचानक लागलेल्या लॉकडाऊनमुळे दैनिक जनतेचा महानायक बंद झाले. नागपूर आणि विदर्भामध्ये दैनिक महानायक विशेष प्रकाशित होत होते. हे वर्तमानपत्र बंद झाले म्हणून दैनिक बहुजन सौरभचा जन्म झाला. भारतातील पहिले सहकार तत्वावर वृत्तपत्र आहे. अनेकांनी जाहिराती, धम्मदान, प्रत्यक्ष मदत करून बहुजन सौरभ वर्तमानपत्राला जगविले आहे. साधनहीन लोकांनी दैनिकाची सुरुवात केली [टाळ्या] दैनिक बहुजन सौरभ मधील संबंधित लोकांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या आहेत. नागपुरातील लोकांनी भरभरून नागपूरकर लोकांनी प्रतिसाद दिला. परंतु त्याचबरोबर ऑनलाईनमध्ये वृत्तपत्राला मोठी ताकद मिळाली. अनेकांनी मदतीचे हात पुढे केले. आपल्या कष्टाचा पैसा दैनिक बहुजन सौरभला दिला आहे. आम्ही, आमची, स्वतःची प्रचाराची यंत्रणा रात्र, दिवस राबविली आहे. केवळ सावलीत बसून हे सर्व काम करीत नाही. पाऊस, ऊन, वारा, वादळ हे सर्व सहन करून लोकसमूहात जाऊनही पेपर वाढावा म्हणून आपल्या परीने आम्ही वारंवार दै. बहुजन सौरभचा प्रचार करीत आहोत. या प्रचाराला तुम्हीही प्रचंड प्रतिसाद दिला आहे. या प्रतिसादाबद्दल आम्ही कृतज्ञताही व्यक्त करतो. दैनिक बहुजन सौरभला तुम्हीच जगवू शकता. तुम्हीच सहकार्य करू शकता.

पहिल्या पानावर आंबेडकरी चळवळीची बातमी, संविधान संरक्षणाची जबाबदारी हमी आणि लेखन. निराश झटकणारे लेखन, सौरभ संवाद, बुद्ध विहार जनगणना, सह बरेच काही दैनिक बहुजन सौरभमधे असते. [टाळ्या] लोकांच्या आज ओठावर दैनिक बहुजन सौरभ हे एक नाव आहे. आमच्या सहकाऱ्यांनी, तुमच्यासाठी, आमच्यासाठी जे काही लेखन केले आहे. पान 1, 2 वरुन जी वैचारिक मांडणी आणि भूमिका. दैनिक बहुजन सौरभने घेतली आहे. त्या वैचारिक भूमिकेचे स्वागतही आपण केले आहे. नागपूर मध्ये 19 लाख लोकसंख्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित लोकांची संख्या आहे. मग हे वृत्तपत्र किमान नऊ हजार लोकांच्या घरोघरी तरी गेले पाहिजे असा आमचा मानस आहे. [टाळ्या] त्या दृष्टिकोनातून आम्ही आमच्या परीने प्रयत्न करीत आहोत. या प्रयत्नाला नक्की यश येईल. अनेक लोक टीका टीपण करतात. तत्त्वज्ञान सांगतात. पण प्रत्यक्ष आम्ही जेव्हा काम करतो त्या वेळेला आम्हाला किती यातना सहन कराव्या लागतात ते आमचा आम्हालाच माहीत आहे आणि म्हणून कधी कधी तर असे वाटते की आम्ही कोणत्या भानगडीत पडलो. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे आम्हाला पुन्हा चेतवतात, पुन्हा सांगतात की नाही हे काम तुम्हालाच करावे लागेल. तुम्हीच करू शकता हा विश्वास देतात. या विश्वाच्या बळावर वर दैनिक बहुजन सौरभची टीम समुहाने करीत आहे. शिव्या तर कोणीही देऊ शकतात. परंतु संयम मात्र ठेवावा लागतो. संयम आणि विश्वास ज्यांच्यामध्ये असेल तोच व्यक्ती वृत्तपत्राच्या दुनियेमध्ये काम करू शकतो. कारण या वृत्तपत्राला आर्थिक काही बंधन आहेत याला काही जाहिरातीचेही बंधन आहेत. ती बंधन पाडून आर्थिक संकटावरती काम करून या संकटाला बाजूला सारून आम्हाला वृत्तपत्र दैनिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वतोपरी काम करावे लागेल. नागपूरातील हा एकमेव असा पेपर आहे की जो आपल्या समाजाचा आहे की जो आंबेडकरी विचारांचा आहे. हा विचार लोकांमध्ये रुजविण्यासाठी धडपडत आहे. दैनिक बहुजन सौरभ ही काळाची गरज आहे या गरजे पोटीच आपलेही वर्तमानपत्र असायला पाहिजे. ही आपली महत्त्वाची भूमिका आहे आणि या महत्त्वाच्या भूमिकेतून दैनिक बहुजन सौरभची ही वाटचाल सुरू आहे. वाटचालीत आपणही आंबेडकरी वृत्तपत्र बाण्यात सहभागी व्हावे अशी आपणास नम्र विनंती आहे. आंबेडकरी बाणा कायम ठेवण्यासाठी आणि कुणापुढेही आर्थिकते कारण पुढे करून आपले मनोबल खचू न देता आपण सर्वांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा आहे. ■ ■

**शब्दांकन - वसंत धम्मदीप.**
**मो. 9326912213**
कोषाध्यक्ष - डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समिती. बुद्धविहार मैत्री संघ.

# गतस्मृतींची गजबज
## एक प्रांजळ आत्मकथन

*चिपळूणचे प्रख्यात कवी, शाहीर आणि चळवळीतले नामवंत कार्यकर्ते राष्ट्रपाल सावंत यांच्या ‘गतस्मृतींची गजबज या आत्मकथनाचे चिपळूण इथे नुकतेच प्रकाशन झाले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष मा. तानाजीराव चोरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी आणि महामंडळाच्या कार्यवाह सुनिताराजे पवार उपस्थित होते. आवर्जून दखल घेतली पाहिजे अशा या पुस्तकाविषयी थोडेसे.*

सकाळ झाली, सूर्य डोईवर आला आणि अवघा गाव गजबजून निघाला. गजबज! हा शब्दच किती सकारात्मक भाव व्यक्त करणारा आहे! गतस्मृतींची गजबज या शीर्षकाखाली आलेल्या आठवणीं अशाच सहजपणे उतरल्या आहेत. त्यामध्ये कोणतीही कटुता नाही, कुणावर दोषारोप नाहीत. रानात निर्मळपणे वहाणाऱ्या एखाद्या झऱ्यासारख्या या आठवणी लिहिल्या आहेत. जणू काही राष्ट्रपाल सावंत आपल्याशी हितगुज करतायत, असे वाटण्यासारख्या या आठवणी आहेत, त्यांची गजबज आहे. त्यांच्या कळमुंडी गावातल्या निनावी, पण उन्हाळ्यातही न आटणाऱ्या नदीसारख्या आठवणी!

आजोबांनी वीस रुपयांसाठी गहाण ठेवलेल्या जमिनीच्या तुकड्याबद्दल लिहिताना, त्यावेळच्या तशा समाजरचनेबद्दल लिखाणात कटुता तर नाहीच, उलट अशा प्रत्येक कठीण प्रसंगात राष्ट्रपाल यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बहुजन समाजासाठी केलेल्या कार्याची जाणीव पुन्हा पुन्हा होत राहते आणि बाबासाहेबांबद्दलची पानोपानी जाणवणारी कृतज्ञ भावना हे या पुस्तकाचे खरे बलस्थान आहे.

मुळातच स्वभावात जराही कडवटपणा नसलेले राष्ट्रपाल बारीकसारीक तपशीलातून लहानपणापासून मदत करणाऱ्या प्रत्येकाचा जाणीवपूर्वक नामोल्लेख करतात. मार्गताम्हन्यातल्या शिक्षकांनी शालेय जीवनात केलेली मदत, मुंबईतल्या ज्या डॉक्टरांकडे कंपाऊंडर म्हणून काम केले ते डॉक्टर, काहीही हातात नसताना केवळ मुलाची हुशारी आणि कर्तबगारी यावर विश्वास ठेवून आपल्या मुलीचा हात लेखकाच्या हाती सोपवणारे गुरुतुल्य सासरे राष्ट्रपाल आजही विसरलेले नाहीत. त्यांच्या लिखाणात गावगाड्याच्या जनजीवनाचा लख्ख आरसा आहे. आज शहरांकडे धाव घेणाऱ्यांना त्यातले संदर्भ, ती वर्णने ठाऊकही असणार नाहीत. खरे तर लेखकाने अनुभवलेले गाव ‘गावकुसाबाहेरचं’ नाहिये; उलट, किरकोळ अपवाद वगळता ऐक्याचा, सामंजस्याचा उच्चार वागणुकीतून करणारे त्यांचे गाव आहे. ग्रामीण साहित्य किंवा दलित आत्मकथनांचा प्रांत अनेक साहित्यिकांनी समृद्ध केला आहे; पण काळाच्या प्रवाहात ज्या आत्मकथनांमध्ये तत्कालीन सामाजिक, भौगोलिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संदर्भ विपुल प्रमाणात आढळतात, समाजशास्त्राच्या अभ्यासकांना महत्त्वाचे वाटतात, तीच पुस्तके आजही बेस्ट सेलर ठरताहेत. अशाच प्रकारचे हे आत्मकथन आहे. पण यातल्या आठवणी लेखकाच्या स्वभावासारख्याच मुक्त आहेत. याच्या प्रस्तावनेमध्ये ज्येष्ठ लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी या पुस्तकाची योग्यता शंकरराव खरात यांच्या ‘तराळ - अंतराळ’ या आत्मचरित्राबरोबर केली आहे, यातच पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित होते. हा केवळ एका व्यक्तीचा किंवा एका घराचा संघर्ष नाही. मुळात, संघर्ष रंगवून सांगणे हा लेखकाचा हेतूच नाहिये, त्यांना सांगायची आहे बहुजन समाजाची आजवरची जडणघडण, डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या चळवळीतून बहुजन समाजाने केलेली वाटचाल त्यांना दाखवायची आहे आणि त्यामुळेच ही आहे नाकारल्या गेलेल्या एका मोठ्या समूहाची संघर्षगाथा! इथे वैयक्तिक दुःख चव्हाट्यावर मांडण्याचा हट्ट नाही, विद्रोहाची भाषा ते चुकूनही बोलत नाहीत; उलट, ‘नाही रे’ हे सांगता सांगता ‘आहे रे’ हा विश्वास आपल्या समाजाला देणारे हे विलक्षण आत्मकथन आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. लेखकाच्या स्वभावातला निरागसपणा पानोपानी दृग्गोचर होतो. इथे कुठेही नाकारले गेल्याचा त्रागा नाही, जे घडले ते सहजपणे सांगितलेले आहे. पण ते सांगताना आज एवढ्या वर्षांनीही कुणी दुखावले जाणार नाही, याची लेखकाने फार मनापासून काळजी घेतली आहे; ही गोष्ट अचंबित करणारी आहे. अनौपचारिक गप्पांमधून राष्ट्रपाल यांच्याकडून ऐकलेले अनेक प्रसंग, अनेक अपमान पुस्तकात उद्धृत केलेले नाहीत, हे विशेष! आडवळणाने सुद्धा ते उल्लेख येणार नाहीत याची काळजी त्यांनी घेतली आहे. दारवंठ्यावर ठेवलेला कानफुटका कप राष्ट्रपालनी वाचकांना दाखवलेला नाही. किती विशेष आहे हे! नाहीतर जुनी देणी फेडण्याएवढे नाव, मानमरातब त्यांनी आता निश्चितच मिळवलेला आहे.



पण डॉ. बाबासाहेबांचे संस्कार लेखकाने खऱ्या अर्थाने अंगिकारलेले असल्याने आत्मकथनातून जुने उट्टे काढण्याचा मोह त्यांना होत नाही.

कळमुंडी गाव आणि एकूणच त्या परिसरात त्यावेळी अस्तित्वात असलेल्या बलुतेदारीचे वर्णन वाचणे अतिशय रोचक आहे. माझ्या आजोळचा तो परिसर असल्याने मला ते वर्णन फार ओळखीचे वाटले. कातळावरच्या नाचणीच्या शेतीबद्दल वाचल्यावर आता प्रत्येक वेळी आशा, (म्हणजे राष्ट्रपाल यांची धर्मपत्नी) मला जी घरची नाचणी देते, ती या संदर्भामुळे आशाच्या प्रेमाबरोबर आता अमृततुल्य लागेल. हे सगळे संदर्भ वाचताना मला अरुण जाखडे यांच्या इर्जिक या पुस्तकाची पुन्हा पुन्हा आठवण होते. कोकणच्या ग्रामीण संस्कृतीचा आरसा म्हणावे, असे ‘गतस्मृतींची गजबज’ हे पुस्तक आहे. कोणताही प्रदेश समजून घ्यायचा असेल तर तिथल्या खेडेगावांना भेट दिली पाहिजे, असे म्हणतात. कोकण म्हणजे तर विविध परंपरा, चालीरीती, श्रद्धा, अंधश्रद्धा यांचे आगरच जणू! हे असे अनेक संदर्भ या पुस्तकात आहेत. आगोटा, कामगत, खलाटा, आखाडा, अशा खेडोपाड्यात त्यावेळी असणाऱ्या पद्धती, त्यांतले अलिखित नियम, भल्याबुऱ्या गोष्टी इथे वाचायला मिळतात. हरकाचा भात, भिंती सारवून त्यावर चुन्याने ‘या बसा, पाणी प्या’ ‘नमो बुद्धाय’ असे काहीतरी घराला घरपण देणारे लिहिणे, गावातले सणवार, श्राद्धपक्ष अशा खूप गोष्टी वाचायला मिळतात. वाचताना एकेकदा आतड्याला पीळ पडतो, पण विशेष म्हणजे शोधूनही अशा प्रसंगांच्या वर्णनात कटुतेचा स्पर्श जाणवत नाही. आई हे तर लेखकाचे परम दैवत! आणि हाच बाईच्या अस्तित्वाकडे बघण्याचा हळवा दृष्टिकोन संपूर्ण लिखाणात जाणवत राहतो. येडा गोविंद, सफारीची गोष्ट, हरकाचा भात, श्राद्धाचे जेवण, मास्तर भटाळ्ला, सर्जरी आणि गाण्याची सीडी, असे पुस्तकातले भाग आवर्जून वाचवेत असे आहेत. शेवटचे, ‘परीक्षा पाहणारी कोरोना महामारी’ हे प्रकरण जिवाला चटका लावणारे आहे. त्यातले सगळेच संदर्भ माझ्या जिव्हाळ्याच्या माणसांशी जडलेले आहेत. मी पुन्हा पुन्हा प्रयत्न करूनही ते प्रकरण संपूर्णपणे वाचू शकले नाही. आत्ता विचार करताना जाणवते, आपण किती सहजपणे म्हणतो, एखाद्या पुस्तकाने आत्मकथनाचा प्रदेश संपन्न केला आहे. पण प्रत्यक्षात एखाद्या सोसणाऱ्या जिवाच्या दुःखाचे गाणे असते ते! राष्ट्रपालना स्वतःच्या, समाजाच्या सोसण्याचे, वेदनांचे गाणे गावेसे वाटण, हे फार कौतुकाचे आहे! कोकणाला मिळालेल्या संपन्न वारश्यामध्ये नमन, जाखडी यांच्याबरोबरच आंबेडकरी जलसा आता लोकप्रिय झाला आहे. ही आवड राष्ट्रपाल यांनी जोपासली आणि आज ते चळवळीतले शाहीर म्हणून प्रख्यात आहेत. वेदनेला प्रबोधनाचा स्वर देणे, खरोखरच अवघड आहे, ते त्यांना साधले आहे! त्यांच्याबरोबर त्यांच्या लेकाला, डॉ. राजरत्न यालाही शाहिरी साधली आहे, हे विशेष!

**आसावरी देशपांडे जोशी**
**मो. 7057557508**

माझी जीवलग मैत्रीण आशा, म्हणजेच सौ. आकांक्षा हिची सावलीसारखी साथ आहे राष्ट्रपालना! शब्दशः समाजाला वाहिलेल्या या माणसापाठी निष्ठेने आणि निःस्वार्थपणे उभे राहाणे, खरेच सोपे नाही. आशाची ‘आकांक्षा’ फळाला आली या प्रकरणामध्ये लेखकाने पत्नीबद्दलच्या भावना कृतज्ञतेने व्यक्त केल्या आहेत. कोकणातून होणारे पुढच्या पिढ्यांचे शहरांच्या दिशेने होणारे स्थलांतर मात्र लेखकाला अहोरात्र डाचते आहे, हे सातत्याने जाणवत राहते. पण फक्त हातावर हात घासत हळहळ व्यक्त करणे, हा राष्ट्रपाल यांचा स्वभाव नाही. कोकणातल्या सांस्कृतिक आणि साहित्यिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग ते घेतात. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरही ते आंबेडकरी जलसा प्रबोधनात्मक रचनांनी गाजवत असतात, पुढच्या पिढीला गावाची ओढ वाटेल अशा रचना ऐकवत असतात. आज चिपळूणच्या विश्वरत्न डॉ. आंबेडकर वाचनालय या रौप्यमहोत्सवी संस्थेचे ते अध्यक्ष आहेत.

मनोगतामध्ये लेखकाने आमच्यासह अनेकांचा ऋणनिर्देश केला आहे. ऋणाईत राहाणे हा राष्ट्रपाल सावंत यांचा स्थायीभाव आहे, हे वाचताना आपल्या लक्षात येते. त्यांनी त्यांचे आयुष्य शब्दबद्ध करावे, अशी खरेच आम्हां सगळ्यांची इच्छा होती आणि संस्कृती प्रकाशनने प्रकाशित केलेल्या ‘गतस्मृतींची गजबज’ या पुस्तकाच्या रूपाने देखण्या स्वरूपात ती पूर्ण झाली आहे. सुनिताराजे पवार यांनी अत्यंत सजगतेने आणि आपुलकीने हे आत्मकथन वाचकांच्या हाती दिले आहे. राष्ट्रपाल आणि आशा यांचा एकुलता एक लेक डॉ. राजरत्न याने केलेल्या कल्पक मुखपृष्ठाची सुरेख मांडणी सुनील मांडवे यांनी केली आहे. नामवंत कवी आणि बोलीभाषांचे अभ्यासक असणाऱ्या अरुण इंगवले यांचा ब्लर्ब पुस्तकाच्या अंतरंगाचा अभ्यासपूर्ण उहापोह करणारा आहे. उत्तम कागद, छपाई आणि बांधणी हे या पुस्तकाचं वैशिष्ट्य आहे. राष्ट्रपाल यांनी लिहावे आणि आपण वाचावे असे वाटले, कारण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला भारत आपल्याला घडवायचा आहे. आज पुन्हा एकदा डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा मागोवा समाजाने डोळसपणे घेण्याची नितांत गरज जाणवते आहे, म्हणून राष्ट्रपालनी लिहिणे आवश्यक होते. खरे तर त्यांच्या पत्नीने, आशाने सुद्धा तिच्या आठवणी शब्दबद्ध करणे आवश्यक आहे; त्यामुळे या आत्मकथनाला सोन्याची झळाळी येईल, असे मला वाटते.

साने गुरुजी म्हणतात - ‘ही माय थोर होईल, वैभवे दिव्य शोभेल, जगतास शांति देईल’. तो सोन्याचा दिस उजाडण्यासाठी हे पुस्तक आपण वाचायला हवे! ‘भेद सारे मावळू द्या, वैर साऱ्या वासना, मानवाच्या एकतेची पूर्ण होवो कल्पना -’ वसंत बापटांना वाटते तसे मुक्तपणे केवळ बंधुतेच्या बंधनाला मानण्यासाठी हे आत्मकथन प्रत्येकाने वाचायलाच हवे!

गतस्मृतींची गजबज -
लेखक - राष्ट्रपाल भा. सावंत
संस्कृती प्रकाशन
पृष्ठ संख्या - 207
मूल्य - 320/- ■ ■

